# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

(महिला व बाल विकास विभाग)

सत्यमेव जयते

कार्यालयाचा पत्ता :- रायगड भवन रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई 400614.

Email- comicdsraigadbhavan@gmail.com दुरध्वनी क्र.022-27576388,322,323 Fax-022-27576324.


जा.क्र. :- एबाविसेयो/अंगणवाडी/का-7/2025-26/3895 नवी मुंबई

दिनांक :- /07/2025.
24 JUL 2025

**महत्वाचे मा उच्च न्यायालय मुंबई समितीच्या शिफारशी**

प्रति,

1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ........ (सर्व)
2) जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद....... सर्व
3) बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प ......... सर्व .

**विषय:- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात धोरण निश्चित करण्याकरिता सेवानिवृत्त न्यायाधीश, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत.**

संदर्भः शासनाचे पत्र क्र.एबावि-2025/प्र.क्र.112/का-6, दि.24 जून, 2025

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील शाळेमध्ये अल्पवयीन मुलींसोबत घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून सु-मोटो जनहित याचिका क्र. 1/2024 दाखल करुन घेण्यात आली आहे.

सदर याचिकेच्या अनुषंगाने दिनांक 03 सप्टेंबर, 2024 रोजी मा. न्यायालयाने शालेय विद्यार्थ्यांवरील अनुचित प्रकार रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत शिफारशी करण्यासाठी समिती गठित करण्यात आली असून सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे. या बाबत संदर्भिय पत्रान्वये शासनास समितीने सादर केलेल्या अहवालातील अंगणवाडीतील बालकांच्या/विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे मुद्यांची कार्यवाही प्राधान्याने करण्यात यावी.

1) अंगणवाडी सेविका/कर्मचारी यांना स्थानिक क्षेत्राची सामाजिक रचना, प्रत्येक बालकांची पार्श्वभूमी, बालकांची वर्तणूक पध्दत समजून घेण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे.
2) शिक्षण हक्क कायदा 2009 नुसार प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाचा अधिकार आहे म्हणून सर्व श्रेणीतील विद्यार्थी शाळेत येतील यांची खात्री करणे ग्रामविकास अधिकारी तसेच अंगणवाडी सेविका/कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. तसेच त्यांच्यामार्फत अंगणवाडीतील गैरहजर बालकांची कारणे निश्चित करुन प्रत्येक बालक अंगणवाडीमध्ये येईल याबाबत कार्यवाही करावी.
3) अंगणवाडीतील बालकांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवता पडताळणे आणि राखणे हे अंगणवाडी सेविका/कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असून ते कटाक्षाने पार पाडले जात आहे किंवा नाही याबाबतची वेळोवेळी खात्री करावी.



Scanned with OKEN Scanner

4) अंगणवाडीच्या आवारात स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध असल्याबाबतची खात्री पंचायत समिती/जिल्हा परिषद, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी करावी. अंगणवाडी सेविका/कर्मचाऱ्यांनी अंगणवाडीच्या आवारात स्वच्छतागृहांची सुविधा नसल्यास सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात यावे.

5) अंगणवाडीतील बालकांची महिन्यातून एकदा स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

६) अंगणवाडी केंद्रांतील बालकांच्या तक्रारी समजून घेऊन त्यावर लवकरात लवकर कार्यवाही अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी करावी.

7) अंगणवाडी कर्मचाऱ्यांना POCSO कायद्याची माहिती देण्यात यावी, तसेच अंगणवाडीत कोणतीही अनुचित घटना घडल्यास स्थानिक पोलिसांकडे तक्रार करावी.

8) अंगणवाडीतील बालकांना प्रात्यक्षिके देऊन "गुड टच आणि बॅड टच" यातील फरक ओळखायला अंगणवाडी सेविकेमार्फत शिकवावे. याकरीता आवश्यकता वाटल्यास अंगणवाडी सेविकांना याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.

९) प्रत्येक जिल्ह्याच्या गटविकास अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी उपरोक्त बाबीची अंमलबजावणीबाबतचा अहवाल घेतील आणि तो शैक्षणिक मंडळ/जिल्हा परिषदेला सादर करतील.

मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन केलेल्या समितीने वरील प्रमाणे केलेल्या शिफारशी आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना अवगत करुन व वरील सूचनांचे प्रत्येक अंगणवाडी केंद्रांत तंतोतंत पालन करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात यावे.

(कैलास पगारे, भा.प्र.से.)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

प्रत:- मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner